नवे निवडणूक आयुक्त गोयल यांची फाईल सर्वोच्च न्यायालयाने मागवली

मुख्य निवडणूक आयुक्त नेमणूक प्रक्रियेत सरन्यायाधीशांचे मत विचारात घ्या; केंद्राला सूचना

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

चार दिवसांपूर्वीच निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या अरुण गोयल यांची कागदपत्रे असलेली फाईल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त तसेच निवडणूक आयुक्तांची नेमणूक कॉलेजियम पद्धतीप्रमाणे करावी, अशा विनंतीच्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या आहेत. या याचिकांची एकत्रित सुनावणी सुरू असताना ॲड. प्रशांत भूषण यांनी अरुण गोयल यांच्या नियुक्तीचा विषय उपस्थित केला. त्यावर बोलताना सर्वोच्च न्यायालयाने वरील निर्देश दिले. निवडणूक आयोगासंदर्भातील व्यापक विषयावर सुनावणी सुरू असताना वैयक्तिक प्रकरणावर विचार करता येणार नाही, असे सांगत ॲटर्नी जनरल आर. व्यंकटरमण यांनी नियुक्तीची फाईल सादर करण्यास विरोध केला. त्यावर न्या. जोसेफ यांच्या पीठाने म्हटले आहे की, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्त्यांबाबत सुनावणी आठवडाभरापूर्वी सुरू झाली आहे. दरम्यानच्या काळात ही नवीन नियुक्ती झाली आहे. गोयल यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर त्यांची नियुक्ती झाली असल्याने या नियुक्तीत काही गडबड आहे का, हे पाहण्यासाठी फाईल सादर केली जावी.

१९९१ सालच्या कायद्यानुसार निवडणूक आयोग पूर्णपणे स्वतंत्र असून, त्यात न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज नसल्याचा मुद्दा केंद्र सरकारकडून सुनावणीवेळी मांडण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक वरिष्ठतेनुसार केली जाते, तर निवडणूक आयुक्तांची नेमणूक सचिव अथवा मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून केली जाते, असेही केंद्राकडून सांगण्यात आले. निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य अबाधित राहणे आवश्यक आहे, त्यामुळे निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली जात असतानाच बारकाईने छाननी होणे गरजेचे असल्याचे यावर न्यायमूर्ती के. एम. जोसेफ यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सांगितले.

सरन्यायाधीशांचे मत विचारात घ्यावे

निवडणूक आयोगाची स्वतंत्रता अबाधित ठेवायची असेल, तर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणूक प्रक्रियेत सरन्यायाधीशांचे मत विचारात घेतले जाणे सयुक्तिक ठरेल, अशी टिपणी सर्वोच्च न्यायालयाने केली. सत्तेत असलेल्या पक्षाला पुढील काळातही सत्तेत राहावेसे वाटणे स्वाभाविक आहे. अशा स्थितीत निवडणूक आयोगाच्या प्रमुखपदी आपले म्हणणे ऐकणारीच व्यक्ती असावी, असे सत्ताधारी पक्षाला वाटले तर त्यात फारसे आश्चर्य नाही. अशा स्थितीत निवडणूक आयोगाची स्वतंत्रता बाधित होऊ शकते. त्यामुळे मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणूक प्रक्रियेवेळी सरन्यायाधीशांचे मत विचारात घेतले जाणे सयुक्तिक ठरेल, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

संक्षिप्त

चारचाकी-ट्रकच्या धडकेत छत्तीसगडच्या दहा जणांचा मृत्यू

रायपूर : छत्तीसगड-तेलंगणा राज्यांच्या सीमेवर रस्ते अपघातात एकाच कुटुंबातील ८ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये दोघांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी कोंडागावमध्ये लष्कराच्या एका जवानाने आत्महत्या केली होती. जवानाचे १० नातेवाईक अस्थी विसर्जनासाठी तेलंगणातील भद्राचलममध्ये गेले होते. मंगळवारी उशिरा रात्री बस्तरला परतत असताना सीमेवरील बोधडुगुडेम गावानजीक त्यांच्या गाडीला ट्रकने धडक दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

अमेरिकेत अंदाधुंद गोळीबारात १० ठार

वॉशिंग्टन : अमेरिकेच्या व्हर्जिनियामध्ये वालमार्टमध्ये अंदाधुंद गोळीबार करण्यात आला. यामध्ये १० जण ठार झाल्याची माहिती समोर येत आहे. स्टोअरच्या एका मॅनेजरने आपल्या स्टाफवर गोळीबार केला आणि त्यानंतर त्याने स्वत:ला गोळी मारून घेतली असल्याचे एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले. हल्लेखोराचा मृतदेह मिळाला असून, या आठवड्यातील हा दुसरा गोळीबार असून, यापूर्वी कोलॅरोडोमध्ये एका क्लबमध्ये गोळीबार झाला होता, यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गुजरात निवडणूक प्रचारादरम्यान ७५ लाख रुपये जप्त

सुरत : गुजरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सुरतमध्ये निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने एका मोटारीतून ७५ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. आयकर विभागाने ही रोकड सील केली असून या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणी दोघा संशयित आरोपींना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

काँग्रेसची ४ डिसेंबर रोजी बैठक

नवी दिल्ली : ४ डिसेंबर रोजी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होणार आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मल्लिकार्जुन खर्गे असतील. यावेळी भारत जोडो यात्रेबाबत चर्चा केली जाणार आहे. खर्गे काँग्रेस अध्यक्ष झाल्यानंतर कार्यकारिणीची ही पहिलीच बैठक असेल.

२०३० पर्यंत मृत्युदर १० टक्क्यांनी कमी करण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

केंद्राने आत्महत्या रोखण्यासाठी पहिल्यांदाच राष्ट्रीयस्तरावर रणनीतीची घोषणा केली आहे. याबाबतची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिले आहे. यामध्ये २०३० पर्यंत आत्महत्येने होणाऱ्या मृत्यू दरात १० टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आणि राज्याराज्यांतील समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जिल्हास्तरावर मानसोपचारतज्ज्ञ आणि मानसिक रोग विशेष तज्ज्ञ यांची नियुक्ती केली जाणार आहे.

हे तज्ज्ञ आत्महत्येबाबत जनजागृती करतील. तीन वर्षांच्या आता प्रभावी नियंत्रणाचे तंत्र स्थापित केले जाणार असून, येत्या पाच वर्षांत देशातील सर्व जिल्ह्यांत मानसिक आरोग्य कार्यक्रमांच्या माध्यमातून आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. देशात रोज ४५० लोक आत्महत्या करत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. रुग्णालयात मनोरुग्ण विभाग तयार केला जाणार आहे. असे सांगण्यात आले.

मारुती सुझुकीची इको नव्या स्टाईलमध्ये

मुंबई : मारुती सुझुकी (इंडिया) नवीन इको चारचाकीमध्ये नवीन आणि अधिक शक्तिशाली इंजिन वर्धीत कार्यक्षमतेसह चालते. देशातील सर्वाधिक विकली जाणारी व्हॅन, मारुती सुझुकी इको सेंगमेंटमध्ये सातत्याने वर्चस्व गाजवत आहे. त्याच्या यशाच्या आधारावर नवीन इकोचे नावीन्यपूर्ण इंजिनियर्ड करण्यात आले आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुहेरी उद्देश असलेले वाहन विकसित केले आहे. आरामदायी आणि प्रशस्त फॅमिली कार शोधणाऱ्या ग्राहकांची मागणी लवचिक करते.

नवीन इंटिरिअर्स आणि वनीन तंत्रज्ञान आणि वैशिष्ट्यांसह नवीन इको मालकांना अभिमान वाटावा आणि त्यांच्या कुटुंबीयांना आकर्षित करण्यासाठी इको डिझाईन केले आहे. नवीन इको प्रत्येक सहलीचा आनंद द्विगुणीत करते. इकोच १.२ एल या प्रगत के सीरीज ड्युअल जेट, ड्युअल व्हिव्हीटी, सुधारित इंटिरिअर्स आणि वर्धित सुरक्षा वैशिष्ट्यांसह नवीन इको ग्राहकांच्या बदलत्या आवडीनुसार तयार केली आहे. एका अर्थाने, ही गाडी म्हणजे ग्राहकांची स्मार्ट निवड असल्याचे मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडचे मार्केटिंग आणि सेल्सचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी शशांक श्रीवास्तव यांनी सांगितले.

गेल्या दशकात ९.७५ लाखांहून अधिक ग्राहकांनी इकोला पंसती दिली आहे, याचा आम्हाला अभिमान असल्याचे श्रीवास्तव म्हणाले.

बजाजची नवी पल्सर पी-१५० गाडी लाँच

पुणे : बजाज ऑटो कंपनीने भारतीय बाजारपेठेत आपली नवी पल्सर बाईक लाँच केली आहे. १५० सीसीचे इंजिन असलेल्या या गाडीचे नाव पल्सर पी-१५० आहे. ही बाईक दोन व्हेरियंटमध्ये असून सिंगल डिस्क आणि ट्विन डिस्क गाडी आहे.

कंपनीने सिंगल डिस्क गाडीची किंमत १.१६ लाख रुपये (शोरूम) आणि ट्विन डिस्कची किंमत १.१९ लाख रुपये (शोरूम) ठेवली आहे. नव्या पिढीचा विचार करून कंपनीने गाडीला स्टायलिश लूक दिला आहे. नवी बजाज पल्सर पी-१५० रेसिंग रेड, कॅरेबियन ब्लू, एबोनी ब्लॅक रेड, एबोनी ब्लॅक ब्लू आणि एबोनी ब्लॅक व्हाईट या रंगांत बाजारात आणली आहे. गाडीची इंधन टाकी मजबूत असून एलईडी लायटिंग बसवण्यात आले आहे. गाडीच्या सीटची उंची ७९० मिमी असून सामान्य उंची असलेल्या चालकाला ही गाडी सुटसुटीत आहे. चार्जिंगसाठी गाडी यूएसबी सॉकेट आणि इन्फिनिटी डिस्प्ले असून यामध्ये गिअर इंडिकेटर, घड्याळ, इंधनाचे प्रमाण आदींबाबतची माहिती मिळते. सस्पेंशनसाठी गाडीच्या पुढील बाजूस टेलिस्कोपिक फोर्क्स आणि मोनोशॉक आहेत. कंपनीने गाडीचे वजनही १० किलोने कमी केले आहे.

नेपोटिझम म्हणजे एकप्रकारचा वारसाच

पणजी : पिनाक कल्लोळी

गेली काही वर्षे चित्रपटसृष्टीतील नेपोटिझम किंवा घराणेशाहीवर खमंग चर्चा होत आहेत. परंतु, माझ्या मते, नेपोटिझम म्हणजे एकप्रकारची वंश परंपरेने मिळालेली देणगी किंवा वारसा आहे, असे मत 'प्यार का पंचनामा' या चित्रपटाचे दिग्दर्शक लव रंजन यांनी व्यक्त केले. इफ्फीत बुधवारी झालेल्या 'मास्टरक्लास' सत्रात चित्रपट समीक्षक कोमल नहाटा यांनी दिग्दर्शक कबीर खान, आनंद राय, निर्माते महावीर जैन आणि गायिका अनन्या बिर्ला यांच्याशी संवाद साधला. यावेळी नवख्या कलाकारांना चित्रपट क्षेत्रातील स्थान यावर चर्चा झाली. रंजन म्हणाले की, आपल्या सर्वांना वंश परंपरेने काहीना काही मिळत असते. आपल्या वडिलांनी किंवा आजोबांनी जे काम केले ते आपल्या पिढीपर्यंत पोहोचत असते.

फेविक्विक ओतून जोडप्याची हत्या

उदयपूर : वृत्तसंस्था

सवतीचा काटा काढण्याची सुपारी तिने मांत्रिकाला दिली. मांत्रिकाने तिच्या पतीसह त्याच्या प्रेयसीशी जवळीक साधली. मांत्रिकाने जोडप्याला परस्परांशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यास सांगितले. दोघे त्यात मग्न असताना मांत्रिकाने फेविक्विक त्यांच्यावर ओतले आणि चाकूने वार करून दोघांची हत्या केली.

राजस्थानमधील उदयपूर जिल्ह्यात हा खळबळजनक गुन्हा उघडकीला आला आहे. मांत्रिक भालेक कुमार याला पोलिसांनी अटक केली आहे. सुखाच्या अतिरेकी प्राप्तीसाठी जोडपे मला संमोहन तंत्राचा वापर करण्यास सांगत असे, असे मांत्रिक भालेशकुमारने पोलिसांना सांगितले. १८ नोव्हेंबरला शिक्षक राहुल आणि त्याची प्रेयसी सोनू कुंवर यांचे निर्वस्त्र मृतदेह जंगलात सापडले होते. पुढे ७२ तासांत पोलिसांनी हत्येचा उलगडा केला. प्रेम प्रकरणातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज होता.

भारत जोडो यात्रा मध्य प्रदेशात; प्रियांका आज सहभागी होणार

बुऱ्हाणपूर : वृत्तसंस्था

गेल्या १४ दिवसांचा महाराष्ट्र दौरा आटोपून राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा बुधवारी सकाळी मध्यप्रदेशात दाखल झाली. बुऱ्हाणपूर जिल्ह्यात बोदरली गावात यात्रेचा पहिला थांबा होता. येथे गांधी यांचे स्वागत करण्यात आले व बंजारा कलावंतांनी लोककला सादर केली. दरम्यान, गुरुवारपासून काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यात्रेत सहभागी होणार आहेत.

मध्य प्रदेशातील पहिल्या भाषणांत राहुल गांधी यांनी भाजपवर टीका करताना आधी भिती दाखवली जाते, नंतर हिंसा केली जाते अशी भाजपची चाल आहे. पण देशात कुणालाही घाबरण्याची गरज नाही असे सांगितले. संध्याकाळी ही यात्रा बुऱ्हाणपूरला पोहोचली. तेथे ट्रान्सपोर्टनगर येथे जाहीर सभेत बोलताना गांधी यांनी बुऱ्हाणपूर हे प्रेमाचे शहर आहे. हाच प्रेमाचा संदेश घेउन आपण श्रीनगरला पोहोचणार आहोत असे सांगितले. यात्रेच्या पहिल्याच दिवशी मध्यप्रदेशने महाराष्ट्राला हरवले असे उद्‌गार काढत त्यांनी आयोजकांचे कौतुक केले.

दरम्यान, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी गुरुवारपासून यात्रेत सहभागी होत आहेत. त्या इंदौर येथे दाखल झाल्या असून गुरुवारी झिरी येथे त्या यात्रेत सहभागी होणार आहेत.

ही पदयात्रा पदासाठी

दाहोद : पदयात्राही समाजाच्या भल्यासाठी केली जाते, पण सध्या सुरू असलेली एक पदयात्रा ही पदासाठी केली जात आहे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दामोह येथील निवडणूक प्रचार सभेत राहुल गांधी यांच्यावर त्यांचे नाव न घेता केली. भाजप एकमेव पक्ष असा आहे जो पक्षापेक्षा देशाला मोठा समजतो. काँग्रेस मात्र कुटुंबवाद आणि जातीयवादाचे दुसरे नाव आहे. काँग्रेसने ६० वर्षांच्या शासनकाळात आदिवासी व्यक्तीला राष्ट्रपती बनवले नाही. भाजपने एका आदिवासी भगिनीला हे पद दिले. काँग्रेसने द्रौपदी मुर्मू यांच्या पराभवासाठी काम केले. असा आरोप मोदी यांनी केला.

पश्चिम रेल्वे

डाऊन/अप मेन / लूप लाइनदरम्यान सेंट्रल ड्रेनची तरतूद

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभियांत्रिकी विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ हे खालील दिलेल्या तपशिलानुसार ई - निविदा मागवीत आहेत. निविदा सूचना क्र. व दिनांक : BCT/22-23/165, dt. २३.११.२०२२ **कार्य व ठिकाण : विरार - जोरावसन अनुभाग : सीनि. डीईएन, उत्तर अनुभाग यांच्या कार्यकक्षेअंतर्गत अ) विरार - सुरत अनुभाग : फॉर्मेशनचे २५० किमी रुंदीकरण, ब) विरार - सुरत : टीबीआर ६५.५८७ किमी, टीएफटीआर - १८.०० किमी व टीएफआर - २४.५३७ किमी या कामांसंदर्भात गाड्यांतील पाणी साचणे टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याच्या तात्काळ विल्हेवाटीकरिता पीएलजी, एसएएच व केएलव्ही येथे प्रीकास्ट ड्रेनद्वारे डाऊन/अप मेन/लूप लाइनदरम्यान सेंट्रल ड्रेन तसेच यार्डमध्ये /अनुभागादरम्यान कटिंगमध्ये कास्ट इन सिटु ड्रेनची तरतूद. कामाचे अंदाजित मूल्य : रु. ७,९४,६४,९९५.४३, इरठे : रु. ५,४७,३००.००, सादरीकरणाची तारीख व वेळ : दि. २०.१२.२०२२ रोजी दु. ३.०० पर्यंत, उघडण्याची तारीख व वेळ : दि. २०.१२.२०२२ रोजी दु. ३.३० वा.** 0606

Like us on facebook.com/WesternRly

शेवगाव नगरपरिषद शेवगाव ता. शेवगाव, जिल्हा : अहमदनगर

ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२२-२३

महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान (राज्यस्तर) महाअभियान अंतर्गत शेवगाव पाणी पुरवठा योजना जिल्हा अहमदनगर या कामाची निविदा (Tender ID-2022_DMA_853896_1) शेवगाव नगरपरिषद शेवगाव यांचेकडून ब-१ नमुन्यात मागविणेत येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. ७२,५०,२०,४२०/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशिल दिनांक २४/११/२०२२ पासून https://mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देणेत येईल.

सही/-

मुख्याधिकारी

शेवगाव नगरपरिषद, शेवगाव

पश्चिम रेल्वे

दुरुस्ती व पुन:निर्माण कार्य व एफओबी बदलण्याचे कार्य

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८ हे खालील निर्देशित तपशील अनुसार ई-निविदा मागवीत आहेत.

अनु. क्र.	निविदा सूचना क्र. व तारीख	कार्य व ठिकाण	कामाचे अंदाजित मूल्य रु. मध्ये	इरठे रु. मध्ये
१	BCT/22-23/166 dtd. २३.११.२०२२	चर्चगेट-जीएलओ बिल्डींग - सीव्हीओ (ईएल-एसअँडटी) चर्चगेट चेंबर व कर्मचारी क्षेत्रफळ १ ला मजला, जीएलओ बिल्डींगची दुरुस्ती व पुन:निर्माण कार्य.	रु. २१,३१,६९६.८२	रु. ४२६००/-
२	BCT/22-23/167 dtd. २३.११.२०२२	माहिम : अटी आधारावर नवीन स्टील एफओबी द्वारे साऊथ एफओबीचे बदलण्याचे कार्य.	रु. ४,२७,५१,४७४.३२	रु. ३६३८००/-

दोन्ही निविदा सादरीकरणाची तारीख व वेळ : दि. १६.१२.२०२२ रोजी ३.०० पर्यंत. दोन्ही निविदा उघडण्याची तारीख व वेळ : दि. १६.१२.२०२२ रोजी ३.३० वा. कामाचे विस्तृत स्वरूप, निविदा दस्तावेज मूल्य (नापरतावा), इरठे, पात्रता अर्हता, कामाचे तत्सम स्वरूप, विस्तृत निविदा अटी यांकरिता कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्यावी. 0600A

Like us on: facebook.com/WesternRly • Follow us on: twitter.com/WesternRly

पुढारी Classified is Now Simplified... छोजा फक्त एका क्लिकवर Click classified.pudhari.news

पाहिजेत

घरी बसून मोबाईल द्वारा रजिस्टर्ड काम करण्यासाठी मुले, मुलींची आवश्यकता आहे. मिसकॉल-७५८१०००६७०.

घरबसल्या मोबाईलवरून काम करा व कमवा ३०,०००/- मुले/मुली, बेरोजगार. मिसकॉल ७२४७७५८३४२.

व्यवसाय

व्यवसाय करा. रॉ मटेरियल कंपनी देणार, बनलेला माल कंपनी घेणार, सोबत ३ वर्षाची हमी. ७७४३९२६८९५, ९६.

कंपनीसाठी घरबसल्या ३ ते ४ तास काम करा महिना २० ह. कमवा मो-९८६७४३५७१६, ७७९६१६०१६९.

कर्ज

कुबेर फायनान्स सर्व योजनां द्वारे पर्सनल सर्व लोन व्या. २%, सूट ४०% एजंट आमंत्रित ८००४८३८०४९.

विवाह

ब्राह्मण वधु २७, शिक्षण १२वी, स्वत:चे ब्युटीपार्लर, हेतु योग्य वर पाहिजे. ८४०७९९१७४१, ७५५८५०८६२६.

वधु वय २७ उंची ५फ़ शिक्षण १० वी घरकाम फॅशन डिझायनर शेतीकाम प्रति १५०००/- रु. रंग गोरा जातीची व शिक्षणाची अट नाही (त्वरीत विवाह) ७०६६३८७७३८

नावात बदल

I Kranti Ramesh Jadhav sarnaik have corrected my incorrect date of birth from 26/01/2000 to the correct date of birth 26/01/2001 as per Maharashtra Government Gazette N. M2034747 Dt. 1-7 Oct.2020

प्लॉट/फ्लॅट

विविध पर्यटन स्थळांलगत समुद्र बिचलगत डॅम टच तयार फार्महाउस बंगलो खरेदी विक्रीस भाडे करारवर तसेच स्वस्त्यात जमिनी खरेदीसाठी ९८६७९३४३१४, ८०९७६४११८१

पानशेत पाचगणी पावना डॅम शहापूर कर्जतमार्ग खोपोली पाली महाड दापोली समुद्रव्हिवला ११ गुंठेपासून अर्धा एकर प्लॉट सहित तयार बागायत शेत घर जमीन बुकिंगसाठी ९१७५२८४४२६, ८१९७६४११८१

कोल्हापूर व नवी मुंबई येथील फ्लॅट विकणे. मो. ९४०३६९५५२३, ८५५२८६८९८९, ८९५६५९८१५१.

जागा पाहिजे

शेती आणि गोशाळासाठी २५ एकर जमीन भाड्याने पाहिजे.

जागा : पनवेल, पेण, खोपोली, कर्जत, नेरळ, तळेगाव

मो. ७६७८०८९३७९

वाचकांसाठी निवेदन

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन प्रा. लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

शब्दकोडे क्रमांक १८१४

१	२	३	■	४	५	६	
७			८	■	९		■
१०		■	११	१२	■	१३	१४
	■	१५				■	
■	१६		■		■	१७	
१८		■	१९				
२०		२१			■		■
	■	२२		■	२३		

आडवे शब्द : १) आच्छादन, गाठोडे; पोथी बांधून ठेवायचे कापड, ४) प्रथा, रीत, रिवाज, ७) एकत्र राहणे, संगत, ९) पेंढी; गवताचे ओझे, १०) विष्टा, ११) मोजण्याचे एकक; चुका काढणे, १३) शेताचा एक तुकडा; परगणा; तालुक्याचा भाग, १५) उघडपणे,बेधडक, खुलेआम, १६) समाजातील मान, इज्जत; प्रतिष्ठा, १७) नामस्मरण, मंत्रोच्चार, १८) तुरुंग, १९) हाकलून देणे, बाहेर घालवणे, २०) क्रमाने जुळविणे, २२) मजला, २३) तळहात / तळपायाचा मध्यभाग. **उभे शब्द :** १) सुगंधी तांदळाची एक उच्च जात, २) फेरफटका, सैर; ट्रिप, ३) नवीन, ५) एक अप्सरा; पार्वती; केळीचे खोड, ६) पाळ्यासारखे पितळेचे मोठे उभट भांडे , ८) जन, लोक, समुदाय, १२) दुसऱ्यावर केलेले उपकार, १४) पाणी वापरल्याबद्दलचे शुल्क, १५) रात्र, १६) रजःकण; फुलांतील तंतू, १७) नामजपाची माळ, १८) दुधासाठीचे धातूचे भांडे, १९) जामिनकी, हमी; ताबा; एक घोटाळा, २१) अंधार.

शब्दकोडे क्रमांक १८१३ चे उत्तर : आडवे शब्द : १) पावलोपावली, ६) रिपरिप, ८) आसपास , १०) समभाग, ११) सामान , १३) नीरव, १४) वसवस, १६) काटक, १८) यशकथा, १९) भानुसप्तमी. **उभे शब्द :** १) पावा, २) लोकसभा, ३) वरीस , ४) लीप, ५) शाप, ७) रिकामा, ८) आमरस, ९) पागनीस, ११) सावकाश, १२) नवकथा, १४) वल्लभा, १५) वईस, १७) टकळी, १८) यमी.

सुडोकू क्र. ३१६३

३			
	१		
		४	
			३

कसे सोडवाल सुडोकू?

सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

उत्तर क्र. ३१६२

३	२	१	४
१	४	२	३
४	१	३	२
२	३	४	१

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क,
प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी
कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: मुंबई

L&T Financial Services

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 09.11.2022 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. साबू सदाशिवन कोडीथोट्टथील (मृत कर्जदार साबू सदाशिवन कोडीथोट्टाथिल ह्यांचे कायदेशीर वारस आणि सह-कर्जदार असलेले) 2. शिनाम्मा साबू कोडीथोट्टथील (मृत कर्जदार साबू सदाशिवन कोडीथोट्टाथिल ह्यांचे कायदेशीर वारस आणि सह-कर्जदार असलेले) 3. फोरस ऑफशोअर सर्व्हिसेस	मालमत्तेचा पत्ता-फ्लॅट नं. 1802, 18 वा मजला, क्षेत्रफळ अंदाजे 1070 चौरस फिट, चटई क्षेत्रफळ आणि दोन स्टिल्ट कार पार्किंग क्षेत्रफळ 882 चौरस फिट, जे 'सी पॅलेस' नावाच्या इमारतीमध्ये आहे जी गाव प्लॉट नं. 2, 2A, 11 ते 17, सेक्टर 36, पाम बीच रोड, करावे नेरुळ नवी मुंबई, महाराष्ट्र-400706, ज्याच्या सीमा अशा: पूर्व: एवरीडे बिल्डिंग पश्चिम: सी होम प्लेस उत्तर: पोद्दार इंटरनॅशनल स्कूल दक्षिण: पाम बीच रोड	MUMHL13000629	10 ऑक्टोबर, 2022	₹40,86,097.6	₹30,445,237.32	₹4,08,60,976/-	17/12/2022	22/12/2022

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **17/12/2022.** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **22/12/2022** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **23/12/2022** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - सनील निकम, संपर्क क्रमांक - 8424870093 पत्ता: एल&टी फायनान्स लि.- ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098, आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक - 8668943242, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098.** या पत्त्यावर संपर्क साधावा. लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 24.11.2022
ठिकाण: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड